विचार हे भांडवल, उदयोग हे मार्ग तर कठीण परिश्रम हे उत्तर आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | सोमवार २८ जुले २०२५ | अंक २११० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# आयुष्मान कार्डचे नियम बदलले, आता या आजारांवर खाजगी रुग्णालयात मोफत उपचार मिळणार नाहीत

केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड असणाऱ्या रुग्णांवर सरकारी आणि खाजगी रुग्णालयांमध्ये मोफत उपचार केले जातात. सरकारकडून रुग्णाचा 5 लाखांपर्यंत खर्च उचलला जातो. मात्र आता आयुष्मान योजनेच्या नियमांमध्ये काही बदल करण्यात आले आहेत. यानुसार आता काही आजारांवर खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार करता येणार नाही, याचा अर्थ फक्त सरकारी रुग्णालयांमध्येच या आजारांवर उपचार केले जातील.

आयुष्मान कार्ड कसे बनवायचे? तुमच्या फोनवर Ayushman App डाउनलोड करा आणि भाषा निवडा. नंतर लॉगिन करा आणि Beneficiary वर क्लिक करा. यानंतर कॅप्चा आणि मोबाईल नंबर टाका फोनमध्ये Beneficiary Search पेज उघडेल. त्यात पीएम-जे योजना निवडा आणि तुमचा राज्य, जिल्हा आणि आधार क्रमांक भरून लॉगिन करा. यानंतर ज्या कुटुंबाचे आयुष्मान कार्ड बनले आहे त्यांची यादी दिसेल. मात्र ज्याचे कार्ड बनलेले नाही, त्यांच्या नावासमोर ऑथेंटिकेट असा पर्याय दिसेल ऑथेंटिकेटवर टॅप करा, आधार क्रमांक टाका- ओटीपी टाका आणि फोटोवर क्लिक करा.




यानंतर, सदस्याचा फोन नंबर आणि नाते लिहा. ई-केवायसी पूर्ण करा आणि फॉर्म सबमिट करा. एका आठवड्यात व्हेरिफिकेशन होईल आणि त्यानंतर तुम्ही हे कार्ड ॲपवरून डाउनलोड करू शकता. आयुष्मान कार्डसाठी लागणारी कागदपत्रे आयुष्मान कार्ड बनवण्यासाठी आधार कार्ड, फोन नंबर, रेशन कार्ड आणि पासपोर्ट आकाराचा फोटो लागेल. तसेच कामगार कार्ड, ई-श्रम कार्ड किंवा सरकारी ओळखपत्राच्या मदतीने तुम्ही कार्डसाठी अर्ज करण्यास पात्र आहात की नाही याची माहितीही मिळेल.

## नियम का बदलले?

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पूर्वी खाजगी आणि सरकारी रुग्णालयांमध्ये 1760 आजारांवर मोफत उपचार केले जात होते, मात्र आता काही आजारांना खाजगी रुग्णालयांमधील मोफत उपचारांच्या यादीतून वगळण्यात आले आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये या आजारांवर उपचार उपलब्ध असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

# जिल्हा वाहतुक शाखेची नेकनूर परिसरात कारवाई १०९ केसेस करुन ७३ हजाराचा ठोठावला दंड

बीड (शेख सोहेल)–बीड जिल्हा वाहतुक शाखेच्या वतीने पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर अधिक्षक सचिन, जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, नेकनूर पोलीस स्टेशनचे गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर येथे आज आठवडी बाजार असल्याने बसस्टॅण्ड वरल मुख्य रस्त्याचा परिसरात वाहतुकीस अडथळा आणणार्या व वाहन नियमांचे उल्लंघन करणार्या १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला व एकाविरुद्ध लायसन निलंबन प्रस्ताव



पाठविण्याची तजवीज ठेवली आहे. वाहतुक शाखेने केलेल्या या कार्यवाहीमुळे बेकायदेशीर वाहनधारकांची धांदल उडाली होती.याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिल्हा वाहतुक शाखेने आज विशेष मोहीम अंतर्गत नेकनूर परिसरात बेकायदेशीर वाहन धारकांना लगाम लागावा व वाहनाच्या नियमामध्ये सातत्य राहावे या हेतूने पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्या सहकार्यांने सकाळी १० वाजण्याच्या सुमारास नेकनूर परिसरात आज आठवडी बाजाराचा दिवस असल्याने रस्त्यावरील नो पार्कींग वाहनांवर व रस्त्यावर वाहने उभे करुन वाहतुकीस अडथळा आणणार्या वाहनांवर तसेच विमा नसणे, पीयुसी नसणे, लायसन्स नसणे, हेल्मेट नसणे या सदराखाली १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावला असून नियमभंग करणार्यांवर पोलीस कारवाई करण्यात आली आहे. या कामीच पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासह पोलीस हवालदार सखाराम, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार टुले, शेख, नेकनूर पो.स्टे.चे खाडे व कदम, पोलीस ड्रायव्हर नारायण यांनी सहभाग नोंदवला तसेच विनाकागदपत्रे वाहने चालवू नका, वाहनांचे नियम पाळा, वाहतुकीस विनाकारण अडथळा करु नका असे आवाहन जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांनी केले आहे.

# ठेवला तर सडतोय अन् विकला की रडवतोय; कांद्याचा का झाला वांदा ?



गेल्या तीन महिन्यांपासून बांगलादेशकडून कांद्याच्या आयातीवर बंदी असल्यामुळे कांद्याच्या दरात सुधारणा होण्याची शक्यता नसल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तविला आहे. दरवाढीच्या अपेक्षेने कांद्याचा साठा चाळीत करून ठेवलेल्या शेतकऱ्यांची सध्या मोठी अडचण झाली आहे. सध्या वातावरणातील ओलाव्यामुळे कांदा सडू लागला आहे. दुसरीकडे, बाजारात विक्री केली तर उत्पादन खर्चही निघत नसल्याने ठेवला तर सडतोय, विकला की रडवतोय, अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. पैठण तालुक्यातील,पाचोड, आडूळ, कडेठाण, विहामांडवा,ढोरकीन, बिडकीन शिवारात वातावरणातील बदलामुळे ओलावा निर्माण झाला. याचा फटका कांदा उत्पादकांना बसला आहे. या वातावरणामुळे कांदा मोठ्या प्रमाणात सडला. अखेरीस शेतकऱ्यांना कांदा फेकून द्यावा लागला. आगामी दिवसांमध्ये कांद्याच्या दरात वाढ, अशी बहुतांश शेतकऱ्यांना अपेक्षा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे बाजारातील चढ–उतारकडे लक्ष लागले आह

# माजलगाव शहर पोलिसांची स्तुत्य कामगिरी : हरवलेले १७ मोबाईल शोधून मूळ मालकांना परत



माजलगाव / प्रतिनिधी. दि. २७ जुलै.

माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात गहाळ झालेल्या १७ मोबाईल फोनचा शोध घेऊन, संबंधित मूळ मालकांना परत देण्यात आले. पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत आभार मानले. डीजीटल युगामध्ये मोबाईल हा प्रत्येक व्यक्तीसाठी केवळ संपर्काचे साधन नसून, वैयक्तिक आठवणी व महत्वाची माहिती जपवणारे साधन आहे. त्यामुळे मोबाईल हरवल्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. शहरातील विविध भागांतील नागरिकांनी हरवलेले मोबाईल शोधण्यासाठी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यानंतर पोलीस स्टेशन पातळीवर विशेष पथकाची नियुक्ती करून एकूण १७ हरवलेले मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले. सदर मोबाईल फोन माजलगाव पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉवत यांच्या हस्ते मूळ मालकांना परत करण्यात आले. यावेळी मोबाईलधारकांनी पोलिसांचे मनापासून आभार मानले. ही कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉवत, मा. अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके मॅडम, तसेच उपविभागीय अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलिस निरीक्षक राहुल सूर्यतळ, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद मुंढे, पो.ह. रामेश्वर खेत्रे (१७९६), पो.का. संतराम थापडे (२२९९) व पो.का. महादेव बहिरवाळ (२१७२) यांनी मोलाची भूमिका बजावली.

# आंतरजिल्हा घरफोडी व चोऱ्या करणारी टोळी जेरबंद, ०३ घरफोडया केल्याचे उघड.( स्थानिक गुन्हे शाखा–बीड कामगिरी)

दिनांक २७/०७/२०२५ मा.पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी बीड जिल्हयामध्ये होणाऱ्या घरफोडया उघड करण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या त्या अनुषंगाने घरफोडी करणाऱ्या आरोपींचा शोध सुरु होता. जानेवारी महीण्यामध्ये पोलीस ठाणे बर्दापुर हद्दीत एकुण तीन ठिकाणी घरफोडया झालेल्या होत्या. त्या घरफोडया करणाऱ्या आरोपींचे नांवे तांत्रिक बाबींचा आधारे उघड झालेली होती परंतु आरोपी मिळुन येत नव्हते, दिनांक २६.०७.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला गुप्तब बातमीदारामार्फतब माहीती मिळाली की बर्दापुर येथे घरफोडी करणारे आरोपी हे माने कॉम्प्लेक्स बीड येथे थांबलेले आहेत. त्यावरुन पोनि/श्री बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांनी सदरील आरोपी पकडण्यासाठी मार्गदर्शन करुन पथक रवाना केले व पथकाने झडप मारुन आरोपींना पकडले. त्यांची नांवे १)शेख ईरफान मुनीर, वय २१ वर्ष, २) मुस्तफा कासिम पठाण, वय २७ वर्ष, दोन्ही रा.अंबेकडकर चौक,पानगांव ता.रेणापुर जि.लातुर असे आहेत. त्याचे कडे गुन्हा संदर्भाने चौकशी केली असता त्यांनी बर्दापुर येथे जानेवारी महीण्यामध्ये मौजे गिरवरी, जवळगाव व बर्दापुर येथे बंद असलेल्या घरामध्ये चोरी करुन सोने व पैसे घेवुन गेल्याची व घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. त्याचे कडुन पोलीस ठाणे बर्दापुर येथील एकुण ०३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आनण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असुन आरोपीना पुढील तपासकामी पोलीस ठाणे बर्दापुर



यांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सपोनि/ससाणे, प्रभारी अधिकारी पोलीस ठाणे बर्दापुर हे करीत आहेत. सदरील आरोपी हे कुख्यात दरोडेखोर व चोऱ्या करणारे पोलीस अभिलेखावरील आरोपी असुन त्याचे वर यापुर्वी विमानतळ पोलीस ठाणे नांदेड येथे ०३ गुन्हे, नांदेड ग्रामीण येथे ०१ गुन्हा, रेणापुर येथे ०१ गुन्हा, परळी ग्रा येथे ०१ गुन्हा असे चोरी व दरोडया सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सदरची कामगिरी मा.श्री. नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, श्री. शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस हवालदार, विकास राठोड, राहुल शिंदे, नितीन वडमारे, पोलीस अंमलदार आशपाक सय्यद, मनोज परजणे, नारायण कोरडे, सर्व स्था.गु.शा.बीड यांनी मिळुन केलेली आहे.

# खरीप २०२४ पीकविमा नुकसान भरपाई रक्कम वेबसाइटवर दिसण्यास सुरुवात – संचालक धनंजय गुंदेकर

## ज्यांनी नुकसानीची तक्रार २ पेक्षा अधिक वेळा ट्रिगर नुसार दिली त्यांनाच ही भरपाई मिळणार

बीड (प्रतिनिधी) ॲग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी कडून पीकविमा मागील वर्षाचा म्हणजे खरीप हंगाम २०२४ चा पीक विमा मंजूर केल्याचे आकडे आता शेतकऱ्यांच्या स्टेट्स मध्ये दिसत आहेत. यामध्ये कापूस, सोयाबीन पिकांचा समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांनी नुकसानीची तक्रार ट्रिगर नुसार केली होती त्या शेतकऱ्यांच्या नावापुढे रक्कम दिसत आहे. येत्या काही दिवसांत ही रक्कम बँक खात्यात वर्ग होण्यास सुरुवात होईल असे पीकविमा कंपनीच्या प्रतिनिधींनी सांगितले आहे. गेल्या खरीप हंगामात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. तरीही विमा कंपनीने शेतकऱ्यांना तक्रार करुनही विमा देण्यास नकार घंटा दाखवली होती. यामुळे हा प्रश्न बराच गाजला असून यासाठी आंदोलन करण्यात आले होते.. तरीही कंपनीकडून विमा देण्यास टाळाटाळ केली. मात्र याच पाठपुरावा सुरूच ठेवल्याने विमा कंपनी नमली असून अखेर विमा कंपनीने विमा योजनेत सहभागी असलेल्या ज्या शेतकऱ्यांनी नुकसानीची तक्रार केली त्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई म्हणून पीक विमा मंजूर केला. कालपासून पिक विमा योजना तक्रारदार शेतकऱ्यांच्या नावापुढे पीक विमा रक्कम मंजूर झाल्याची दिसून येत असल्याची माहिती कृषी उत्पन्न बाजार समिती बीड येथील संचालक धनंजय गुंदेकर यांनी दिली आहे.

# वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम संत सावता महाराजांनी केले – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड दि.26 (प्रतिनिधी):- साडेसातशे वर्षापासून प्रवाहित असलेल्या वारकरी संप्रदायाने समाजातील अनेक दोष दूर केले. माणसातली जळमटे दूर केली. समाजातील जातीभेद,हिंसा, द्वेष,भेदाभेद दूर करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले असून वारकरी संप्रदायामध्ये सुस्पष्टता आणण्याचे काम संत सावता महाराजांनी केले असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. बीड येथील नव्याने उभारलेल्या श्री संत शिरोमणी सावतामहाराज मंदिर स्थळी ते दर्शनासाठी आले असता ट्रस्टींनी शहरातील प्रमुख लोकांना एकत्रित बोलावून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा संवाद कार्यक्रम घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंदिराचे जेष्ठ ट्रस्टी नामदेवराव दुधाळ हे होते. यावेळी ह.भ.प.अरुण डाके, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास बडगे,गणपत डोईफोडे,



पत्रकार दिलीप खिस्ती, नगरसेवक शुभम धूत, बाबुराव दुधाळ, विशाल घाडगे, दादासाहेब मुंडे, ॲड.सतिश शिंदे आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, संत ज्ञानेश्वरांपासून ते संत तुकाराम महाराजापर्यंत आणि त्यानंतरही वारकरी संप्रदायाचे महत्त्व अधोरेखित होत आहे. सर्व संतांमध्ये श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे वारकरी संप्रदायामध्ये कार्य अधिक महत्त्वाचे आहे. सावता महाराजांनी वारकरी संप्रदायात कर्म अर्थात कर्तव्याला अधिक महत्त्व आहे हे निक्षुण सांगितले. प्रपंचातून देखील परमार्थ साधता येतो. केवळ परमार्थासाठी यज्ञ,याग,तप करणे जरुरीचे नाही हे सांगितले. समाज कर्म प्रधान बनवला. कर्म हाच धर्म असे सांगून माणसाला क्रियाशील बनवण्याचे काम सावता महाराजांनी केले. वारकरी संप्रदायाला व्यवहार्य बनविण्याचे काम सावता महाराजांनी केले. प्रपंच करून परमार्थ साधता येतो आणि परमार्थ म्हणजे शुद्ध अंतकरणाने केलेले नामस्मरण.अशा नामस्मरणामुळे माणसाचे अंतकरण शुद्ध होते आनंदी होते आनंद म्हणजेच धर्म होय. इतकी सुस्पष्टता वारकरी संप्रदायांमध्ये सावता महाराजांनी आणलेली आहे असे ते म्हणाले. तर प्रास्ताविकात प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांनी श्री संत सावता महाराज मंदिराची देण जयदत्त क्षीरसागर यांची असून त्याचे संवर्धन डॉ. योगेश क्षीरसागर यांनी केल्याचे सांगितले. लोक सहभागातून होत असलेल्या या समाजोपयोगी वास्तूला माळी समाजातून प्रचंड योगदान मिळाले असून अन्य समाजाने देखील येथे आपले योगदान नोंदविले आहे,असे सांगितले. याप्रसंगी दादासाहेब मुंडे, मोहन गोरे, अध्यक्ष नामदेव दुधाळ यांची समायोजित भाषणे झाली. मंदिराला वस्तू रूपाने विशेष देणगी दिलेल्या दानशुरांचा सत्कार यावेळी करण्यात आला. सुरुवातीला मंदिरात सावता महाराजांची आरती माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते झाली. यावेळी समाज बांधव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्यामसुंदर घाडगे यांनी केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २८ जुले २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### चुकीला माफी नाही!

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था येत्या पाच वर्षांत एक लाख कोटी डॉलरचा टप्पा गाठेल, या ङ्गमॉर्गन स्टॅनलीफ च्या ताज्या अहवालात व्यक्त झालेल्या आशावादातून महाराष्ट्राचे देशातील आघाडीचे स्थान पुन्हा अधोरेखित झाले आहे. सत्ताधारी-विरोधकांच्या याबाबतच्या दाव्या-प्रतिदाव्यांपेक्षा अशा आंतरराष्ट्रीय संस्थेचा निष्कर्ष अधिक विश्वासार्ह व महत्त्वाचा ठरतो. सध्याचे राज्यांतर्गत उत्पादन (जीडीपी) ५३६ अब्ज डॉलर, म्हणजे सिंगापूरच्या बरोबरीने असल्याची बाबही राज्यातील नागरिकांना सुखावणारीच आहे. ङ्गमॉर्गन स्टॅनलीफ ने विविध क्षेत्रांमधील राज्याच्या प्रगतीचे तपशीलवार चित्र या अहवालात मांडले आहे. त्यामध्ये या प्रगतीमागील कारणे, प्रगती होत असलेल्या क्षेत्रांसह काही आव्हानांचीही चर्चा केल्याचे दिसते. त्यानुसार पावले टाकून सन २०३० पर्यंत सध्याच्या दुपटीने प्रगती करण्याचे आव्हानही या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. वाहनांची निर्मिती आणि सुट्या भागांचे सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात होत असून, देशातील या उत्पादनातील राज्याचा वाटा वीस टक्के आहे. त्याबरोबरच औषधे आणि वैद्यकीय उपकरण निर्मिती १६-१७ टक्के, कापडाचे उत्पादन ८-१२ टक्के इतके आहे. गुजरातपाठोपाठ महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे निर्यातदार राज्य ठरले आहे. देशातील १५.४ टक्के निर्यात महाराष्ट्रातून होत असून, त्याचा देशाच्या ङ्गजीडीपीफ्त १३.७ टक्के इतका वाटा आहे. त्यामध्ये दागिने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, रसायने, औषधे आणि यंत्रसामग्रीचा समावेश होतो. परकीय गु ंतवणुकीतही राज्य आघाडीवर असून, गेल्या वर्षी राज्यात १९.६ अब्ज डॉलरची गु ंतवणूक झाली आहे. विशेषत: आर्थिक व तंत्रज्ञानातील प्रगतीला गती देणाऱ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील देशातील अठराशे ङ्गग्लोबल केपॅबिलिटी सेंटरफ्पैकी सर्वाधिक (७३०) सेंटर, ही स्पर्धात्मक युगात महाराष्ट्रासाठी विशेष अभिमानाची बाब ठरावी. या अहवालाने गु ंतवणुकीसह महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण, निर्यात, आर्थिक शिस्त, साक्षरतेचे प्रमाण आणि स्थिर नेतृत्वाला या प्रगतीचे श्रेय दिले आहे. ङ्गजीडीपीफ्च्या तुलनेत कर्जांचे प्रमाण इतरांच्या तुलनेत कमी, सेवा क्षेत्राचे मोठ े योगदान; तसेच धातू, वाहन, अन्नप्रक्रिया, पेट्र ोलियम आणि यंत्रसामग्री या क्षेत्रांतील वाटचाल या विकासात महत्त्वपूर्ण ठरली आहे. गेल्या काही वर्षांत राज्यातील औद्योगिक क्षेत्राचे योगदान घटले असून सेवा क्षेत्राचे योगदान वाढत असल्याची नोंद पुढील दिशा दाखवते. आर्थिक प्रगतीमध्ये प्रामुख्याने गुजरात, तमिळनाडू आणि तेलंगण आदी राज्यांशी महाराष्ट्राची स्पर्धा आहे. त्यामुळेच एक लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेच्या मार्गातील आव्हाने ओळखून उपायांची पावले टाकण्याची हीच वेळ आहे. सरकार पायाभूत सुविधांमध्ये मोठी गु ंतवणूक करीत असून त्यातून वाढवण बंदर, नवी मु ंबई विमानतळ, नुकताच पूर्ण झालेल्या समृद्धी महामार्गासह नियोजित नागपूर गोवा द्रुतगती महामार्गासारख्या सुविधा उभ्या राहत आहेत; मात्र अनेक कारणांमुळे अशा प्रकल्पांना होणारा विलंब टाळून त्यांना अधिक गती देणे आवश्यक आहे. भौगोलिक असंतुलन दूर करून मु ंबई-ठाणे-पुणे व नाशिकच्या पलीकड े या विकासाची पावले वळली पाहिजेत. काहीशा मागे पडत असलेल्या उत्पादन क्षेत्राला गती देण्यासाठी नव्या उद्योगांच्या स्थापनेतील लालफीतशाही, भ्रष्टाचार अशा राजकीय-प्रशासकीय त्रुटी दुरुस्त करण्याची गरज आहे. त्यांच्यासाठी रस्ते, स्वस्त आणि अखंडित वीजपुरवठा, वित्तपुरवठा, ऊर्जा व पर्यावरण सुरक्षा यांकडेही विशेष लक्ष पुरवावे लागेल. याच ङ्गमॉर्गन स्ट ॅनलीफ्च्या एका अहवालानुसार महाराष्ट्रात सुमारे सव्वापाच टक्के इतके बेरोजगारीचे प्रमाण असून, शहरी भाग आणि सुशिक्षितांमध्ये ते अधिक आढळते. हे चित्र बदलण्यासाठी रोजगारक्षम क्षेत्रांमधील आवश्यक कौशल्य प्रशिक्षणावर भर द्यावा लागेल. हे लक्ष्य गाठतानाच स्थलांतर, शहरांमध्ये होणारे केंद्रीकरण, बकालीकरण, सुविधांवर येणारा ताण, हवामान व आरोग्यसंकटे, उत्पन्नातील विषमता या आनुषंगिक आव्हानांचाही सामना करावा लागणार आहे.

# शाहीन अकॅडमीकडून समाजात शैक्षणिक क्रांती घडवण्याचा प्रयत्न - डॉ. अब्दुल क़दीर

## गुलाम साकिब लिखित मुहम्मद मुस्तफा स.अ.स. पुस्तकाचे प्रकाशन

### अल्मा फातिमा सह इतर नीट मधील गुणवंतांचा सन्मान सोहळा थाटात साजरा





बीड (प्रतिनिधी) - शहरातील हॉटेल गोल्डन चॉइस, बार्शी रोड, बीड येथे शाहीन अकॅडमीकडून अल्मा फातिमा सह इतर नीट मधील गुणवंतांचा सन्मान सोहळा थाटात साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. अब्दुल क़दीर यांनी म्हटले की, शाहीन अकॅडमीच्या माध्यमातून समाजात शैक्षणिक क्रांती घडवायची आहे. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनी पालक वर्ग शिक्षक शिक्षिका आणि समाज धोरणांचे अमूल्य सहकार्य अपेक्षित आहे. या सत्कार व मार्गदर्शन सोहळ्यात बीड शहरातील लेखक ख्यातनाम सूत्रसंचालक आणि शिक्षक असलेले अब्दुल रहीम उर्फ गुलाम साकिब लिखित पैगंबर मुहम्मद मुस्तफा सल्लल्लाहू अलैही व सल्लम यांच्यावर आधारित पुस्तकाचा प्रकाशन सोहळा ही पार पडला. यावेळी शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे संस्थापक अध्यक्ष आणि शैक्षणिक मार्गदर्शक डॉ. अब्दुल क़दीर यांनी समाजातील अज्ञानी रुढींवर अनावश्यक खर्च करण्याऐवजी त्या खर्चाचा उपयोग आपल्या मुलामुलींच्या शिक्षणावर केला पाहिजे. लग्नसमारंभात लाखो-कोटी रुपये खर्च करणाऱ्या समाजाने सर्वप्रथम लग्नाच्या जेवणाचा बहिष्कार करावा. साध्या सरळ पद्धतीने लग्न लावावे.

या कार्यक्रमात डॉ. अब्दुल क़दीर यांच्या हस्ते अब्दुल रहीम उर्फ गुलाम साकिब लिखित "सीरत मुहम्मद मुस्तफा सल्लल्लाहु अलैही व सल्लम" या पुस्तकाचे प्रकाशन जिल्हा अभियंता, अबकारी विभाग बीडचे इंजि. अब्दुल हमीद खान यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना इंजि. अब्दुल हमीद खान यांनी म्हटले की, आजच्या काळात सीरतवर आधारित पुस्तके वाचणे आणि ती नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे फारच गरजेचे झाले आहे. तसेच शाहीन अकॅडमीच्या माध्यमातून डॉ. अब्दुल क़दीर यांनी समाजाला शैक्षणिक मागासलेपणातून बाहेर काढण्याचा फार मोठा प्रयत्न केला आहे. बीडमधील शाहीन अकॅडमीत मुलींना सुरक्षित आणि उत्कृष्ट प्रशिक्षणाचे वातावरण मिळत आहे. ब्रेन पॉवर ट्रेनर इंजि. इफ्तिखार पटेल, सय्यद नवीद उज़ ज़मां, डॉ. शेख अक़ील, शेख मुहम्मद शरीफ, मुहम्मद आरिफ यांनी विद्यार्थिनी व पालकांना लाभदायक होईल असे मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. यावेळी शाहीन अकॅडमीच्या एज्युकेशनल टॅब चेही विमोचन करण्यात आले. नीट च्या गुणवत्ता यादीत शीर्ष स्थानावर आलेल्या अल्मा फातिमा सय्यद असद अली





(586), आमना कुलसूम आमिर, सालेहा अमजद, अनम रफीउद्दीन यांचा डॉ. अब्दुल क़दीर यांनी पालकांसोबत सत्कार करून भरभरून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात शेख रफिक तांबोळी, अकील अहमद, असलम अनवरी, काज़ी शफिउद्दीन, डॉ. सफी अनवरी, मुज्तबा अहेमद खान, मौलाना साबिर रशीदी, ॲड. शेख शफीक भाऊ, प्राचार्य सिद्दीकी नवीद, परभणीचे नजीम भाई, पत्रकार अदनान खान, डॉ. मुबारक, मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़, शुजाअत देशमुख, जावेद बागबान, शाहिद खान, अनवर पाशा, सूफियान मनियार, समीर शेख, फहमीद खान, शफीक फारूकी, आसिफ ज़मां, सय्यद असद, इंजि. इम्रान बागबान आदींची उपस्थिती होती. शाहीन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे बीड शाखा प्रमुख प्राचार्य डॉ. इम्रान मुनीर खान यांचे डॉ. अब्दुल क़दीर यांनी विशेष अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. अजित कुमार यादव, डॉ. जुबैर, फहीम, शेख जुनैद, रेहाना बाजी आणि सेविका खाला यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन गुलाम साकिब, लिजा खान आणि अल्फिया पठाण यांनी केले तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. इम्रान खान यांनी केले. अशा प्रकारे विद्यार्थी व पालकांचे सत्कार आणि मार्गदर्शन हा कार्यक्रम संपन्न झाला.

# "माणसाने मानवधर्म जोपासणे काळाची गरज मा.राहुल सुरवाडे यांचे यांचे प्रतिपादन."

दि.२६- रोजी आझाद नारी फाउंडेशन यांच्या वतीने पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रम संपूर्ण जिल्हाभर सध्या चालु आहे. त्यातचं आज जिल्हा परिषद शाळा दत्तवाडी उरुळी कांचन येथील शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रम संस्थेच्या वतीने करण्यात आले. यावेळी शिंदवणे केंद्रातील ३७५ विद्यार्थीना संस्थेच्या वतीने बॅग, बसण्याची मॅट व चप्पल इत्यादी साहित्य देण्यात आले. संस्थेने यावर्षीच्या शैक्षणिक सत्रापासून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याचा मानस केला असुन त्यासाठी कष्टकरी शेतकरी, कामगार व एखाद्या व्याधीने ग्रस्त अनाथ व एकल पालकांच्या गुणवंत गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व त्याचे पालकत्व घेण्याचे ठरविले आहे.



त्यासाठी संस्थेने ध्येय व उद्दिष्ट ठेवून कार्य आराखडा तयार केला असून त्यानुसार जिल्हा परिषद शाळेमध्ये साहित्य वाटप त्याच बरोबर मुलींना स्व:संरक्षणाचे धडे देण्याचे कार्य सध्या हाती घेतले आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य बॅग, बसण्याची मॅट व चप्पल इत्यादी साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे संचालक मा.राहुल सुरवाडे यांनी सांगितले कीं, विद्यार्थ्यांना ध्येय गाठायचे असेल तर प्रचंड मेहनत घेऊन अभ्यास केल्यास नक्कीच यश गाठता येते आज आपला सन्मान त्याचे द्योतक आहे. त्यासोबतच माणसाने मानवता धर्म जोपासणे सुद्धा आजच्या काळात फार गरजेचे आहे. ही मदत सुद्धा त्याचाच भाग आहे. देण्याची सवय माणसाने बाळगणे फार गरजेचे आहे. विद्यार्थी हेच देशाचे भविष्य आहे त्यामुळे त्यांचा सन्मान करणे आम्हीं आमचे कर्तव्य समजतो. तर मा.युवराज ताठे हे म्हणाले, विद्यार्थ्यांनी बौद्धिक प्राप्ती साधण्यासाठी प्रचंड वाचन केले पाहिजे आझाद नारी फाउंडेशन च्या अशा स्तुत्य कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा मिळते आपातकालीन संकट असो अथवा सामाजिक शैक्षणिक कार्य असो आझाद नारीची संपूर्ण टीम हे स्वतःला झोकुन देवून काम करते त्यामुळे सर्व जाती धर्मातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून, विद्यार्थ्यांच्या गुणगौरव कार्यक्रमाच्या माध्यमातून कौतुकाची थाप पडते विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व प्रेरणा मिळते त्यामुळे हा स्तुत्य उपक्रम आहे असे कौतुक देखील त्यांनी याप्रसंगी केले.! कार्यक्रमाच्या सुरुवातीस सावित्रीमाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य कल्याणी वाघ मॅडम, जुबेर तांबोळी, खेमराज टकुल्ला, प्रसाद शेठ, मयूर मकर , अश्विनी कांचन यांनी मदत केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष- मा.राजेंद्र कांचन(माजी सरपंच उरुळी कांचन), प्रमुख पाहुणे- युवराज ताठे सर, वैशाली खामकर, सुजाता घटे, सारिका ताठे, मधुकर खेडकर इतर शिक्षक व पालकवर्ग विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा.शेख मॅडम यांनी केले तर यांनी केले तर आभार मा.खेडकर मॅडम यांनी मानले.

# सामान्यांच्या जीवाशी घातकी खेळ : शासन-प्रशासनाकडून कारवाई व्हावी, अन्यथा सर्वोच्च न्यायालयाने जनतेला स्वसंरक्षणाची मुभा द्यावी ! ज्येष्ठ नागरिक संघटना व जनतेतून होतेय मागणी

शरीर स्वास्थ्य निरोगी राहण्यासाठी जीवनावश्यक अशा पालेभाज्या, विविध फळं आणि कंदमुळं गटाराच्या घाण धुतली जातात. त्याशिवाय केमिकल मिश्रीत पाण्यात डुबवणे, कच्ची फळं लवकर पिकली जावीत यासाठी सर्वच फळांना आरोग्यास घातक अशी इंजेक्शन्स देण्याचे कारस्थानी कृत्य बहुसंख्य विक्रेते, पुरवठा धारक एजेंट राज्यात सर्वत्र अगदी खुलेआम करीत असतात. ज्यामुळे सर्वसामान्य नागरिक, विशेषतः लहान लहान मुलं, महिला, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांच्या जीवाशी खेळले जाणारे हे जीवघेणे प्रकार ओढवले जाऊ नयेत यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आणि शासनाचे अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागांकडून त्यावर देखभाल ठेवणे, नियंत्रण आणणे एवढेच नाही तर कठोर कारवाई करणे आवश्यक ठरले जाते. परंतु तशा प्रकारची कोणतीही दंडात्मक कारवाई प्रशासनाकडून केली जात नाही. त्याचाच परिपाक म्हणून असे घातकी व जीवघेणे प्रकार खुलेआम घडलेच नसते. शासन-प्रशासनाकडून अशा भयाण प्रकारांना आळा घातला जाणार नसेल तर मात्र जनतेला स्वसंरक्षणासाठी परवानगी मिळावी, अशी आग्रही मागणी ज्येष्ठ नागरिक संघटना व आणि विविध स्तरांतून सर्वोच्च न्यायालयाकडे केली गेल्यास चुकीचे ठरु नये. शासन-प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळेच न्यायालय आणि न्यायदेवता जनतेसाठी एकमेव न्यायिक व्यासपीठ ठरले जाईल, यात तिळमात्र शंका नसावी.

या माध्यमातून न्यायदेवतेच्या असेही निदर्शनास आणून देतात येईल की, तशा प्रकारचे थेट आदेश देणे शासन प्रणालीवर मात करणारे ठरत असले तरी जनमानसांचे जीवनमूल्ये त्याहीपेक्षा अधिक महत्वाचे ठरले जातील, याचाही प्रकर्षाने विचार केला जाणे आवश्यक आहे. तथापि किमान पक्षी तसे शासन-प्रशासनाला ठणकावून कठोर कारवाईचे आदेश तरी दिले जावेत. जेणेकरून लक्षावधी लोकांचे जीव वाचले जावू शकतील.

नागरी जीवन जगताना दैनंदिन आहारामध्ये पालेभाज्या व फळांप्रमाणेच कडधान्य व आणखी जे जे आवश्यक ठरले जाते, त्यातील सफेद वाटाणे हे हिरवे दिसावेत यासाठी त्यांना केमिकल मिश्रीत हिरवी पावडर लावली जाते, पिकलेली परंतु कांहीसी सफेद दिसणारी मिरची लाल भडक दिसावी म्हणून तिला केमिकल मिश्रीत लाल पावडर फवारणे, मुळा, रताळी आणि गाजर आदींची जमिनीतून काढणी झाल्यानंतर त्यांना गटाराच्या घाण पाण्यात भिजवून अक्षरशः तळ पायाच्या सहाय्याने घासून घासून धुतले जाते. त्यानंतर गाजर लालभडक दिसावेत यासाठी केमिकल मिश्रीत लाल रंगात घुसळिवली जातात, मेथी, सेफू, पालक व अन्य बऱ्याच पालेभाज्यांसह कोथमीर आणि काकडी सुध्दा याच गटाराच्या घाण पाण्यात धुतली जाते. एवढेच नाही तर ते सर्व हिरवेगार दिसून ग्राहकांना आकर्षित करता यावे यासाठी त्यावरही केमिकल मिश्रीत हिरवा कलर फवारला जातो.

कच्ची केळी बागेतून घरी किंवा पट्टीच्या ठिकाणी आणल्यानंतर ती मार्केटला विक्रीसाठी नेण्याअगोदर त्या केळीच्या घडालाही केमिकल द्रव्यात डुबविले जाते. तर कलिंगड हे कोवळे असले तरी ते आतून लालभडक दिसले जावेत यासाठी त्या सर्वांना केमिकल मिश्रीत लाल व गोड अशा द्रव्याचे इंजेक्शन दिले जाते, ज्यामुळे ग्राहक खुश होत असतात. केळीच्या देठापासून ते शेड्यापर्यंत प्रत्येक केळी घडासह पिकलेली गडद पिवळी दिसली जाते. खरं तर नैसर्गिकरित्या पिकलेली केळी शेड्याकडून पिवळी दिसेल परंतु ती देठासह समोरचा काही भाग हिरवाच दिसला जातो, हे मुळीच नाकारता येणार नाही. त्याशिवाय सफरचंद,



घाण पाण्यात गाजर पायाने धुताना

नास्पती, पेर, डाळींब आणि पेरु, आंबे यासारखी अनेक फळे, पिकलेली दिसली जावीत यासाठी त्यांना केमिकल मिश्रीत अशी घातक इंजेक्शन्स दिली जातात. तशा खूनाही फळांवर दिसून येतात. आश्चर्याची बाब म्हणजे झाडावर असलेले कच्चे हिरवे नारळ, ज्यांना शहाळी म्हटले जाते, या सर्वांना इंजेक्शन देऊन ते लवकर पिकविण्याचे गोरखधंदे केले जातात. ते सुद्धा चक्क झाडावर चढून दिले जातात. ही शोकांतिकाच म्हणावी लागेल.

शरिराला अधिक प्रमाणात पोषक आहार मिळावा म्हणून आपण जेवणात कच्च्या व शिजवलेल्या विविध पालेभाज्यांचा आवर्जून वापर केला जातो. रुग्ण, ज्येष्ठ नागरिक विशेषतः लहान लहान मुलांना शहाळीचे पाणी शक्तीवर्धक ठरले जावे, अशी विविध फळे, नारळ आदींचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात येतो. परंतु त्यासाठीही केमिकल मिश्रीत घातक अशा द्रव्याचा वापर खुलेआम केला जातो. परंतु सर्वांच्या आयुष्यातील आहारांशी निगडीत फळांवर घातकी प्रक्रिया अंमलात आणून त्या भयाण कृत्याच्या माध्यमातून मानवी जीवाशी खेळले जाते.

जीवघेणा प्लास्टिकचा तांदूळ बाजारात

शरिराला पोषक व स्वास्थ्याच्या दृष्टीने आहारात चांगल्या गुणवत्तेचा तांदूळ वापरता यावा, यावरच अधिकांश लोकांचा कटाक्ष असतो. परंतु तो महागडा व गुणवत्तापूर्ण असा तांदूळ घेणे सर्वांनाच परवडणारे नसते. सामान्य तथा मध्यम वर्गीय जनता शक्यतो शासनमान्य स्वस्त धान्य दुकानातून मिळणारा रेशनचा तांदूळ उपयोगात आणत असते. तथापि तोही सरकारी तांदूळ मिळणे अलिकडच्या काळात अधिकच दूरापास्त होऊन बसले आहे. गरिबांच्या तोंडचा हक्काचा (तांदूळ) तो घासही भ्रष्टाचाराने बरबटलेली यंत्रणा हिरावून घेत आहेत. परस्पर लंपास करीत आहेत. शासनाचे अधिकारी, दलाल आणि व्यापारी यांच्या संगनमताने रेशनचा तो तांदूळ सुध्दा परस्पर बाहेरच चढ्या भावाने काळ्या बाजारात विकून ही भ्रष्ट यंत्रणा आपले उखळ पांढरे करुन घेत असतात. याच संधीचा गैरफायदा घेतला जात आहे. अशावेळी बाजारात चक्क प्लास्टिकचा तांदूळ विक्री करुन जनतेची घोर फसवणूक केली जातेय.

भंगारात विकल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या रिकाम्या बाटल्या, पिशव्या, डब्बे, ड्रम आदी साहित्य थेट कारखान्यात नेऊन त्यांच्यावर प्रक्रिया केली जाते. त्यातूनच अगदी हुबेहूब तांदूळ बनवला जातो. जो शरीर स्वास्थ्याच्या दृष्टीने भयंकर हानिकारक असला तरी भेसळयुक्त पध्दतीने मोठ्या प्रमाणात विक्री केला जात आहे. शासनाच्या अन्न व भेसळयुक्त प्रतिबंधक अशा कोणत्याही यंत्रणा त्यावर नियंत्रण ठेवत नसाव्यात, म्हणूनच तो बाजारात भेसळयुक्त पध्दतीने अगदी खुलेआम विक्री केला जात आहे. कदाचित त्यातही शासनाच्या कार्यरत यंत्रणा संगनमताने असा जीवघेणा गोरखधंदा करीत असाव्यात. नव्हे, त्यात तिळमात्र शंका नसावी. स्वतंत्र भारतातील नागरिकांच्या जीवाशी खेळल्या जाणाऱ्या अशा कितीतरी भयाण अवस्था आहेत, ज्यांचे शासन-प्रशासनाच्या भ्रष्ट यंत्रणेला जनतेप्रती काहीच देणेघेणे नाहीय.

शासनाचा अन्न व औषधी भेसळ विरोधी नियंत्रक कक्ष तथा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासकीय यंत्रणांकडून अशा विघातक कृत्यावर कटाक्षाने नजर ठेवणे अपेक्षित असते. नव्हे नव्हे, ते त्यांचे कर्तव्यच ठरते. परंतु तसे काहीही न करता दुःशासन प्रवृत्तीच्या एजेंटांसह विक्रेत्यांना रान मोकळे सोडले जाते. या व अशा प्रकारच्या अनेक गंभीर कृत्यांवर तातडीने चाप बसवला जावा, यासाठीचे सक्त निर्देश, आदेश न्यायदेवता म्हणून आपल्या माध्यमातून शासन, प्रशासकीय यंत्रणेला अगदी कठोरपणे द्यावेत, अन्यथा जनतेला स्वसंरक्षणासाठी प्रसंगी कायदा हाती घेणे का गरजेचे ठरु शकते, याचे महत्व पटवून देत तशी मुभा दिली जावी, अशी आग्रही मागणी जनतेतून केली जाणे स्वाभाविक आहे. जनतेला याचे पूर्ण भान व त्या संबंधीचे ज्ञान अवगत असू शकते की, हे महत्प्रयासी कर्तव्य पूर्णपणे शासन-प्रशासनाचेच आहे. परंतु या सर्व यंत्रणा भ्रष्टाचाराने बरबटल्या गेल्या आहेत. त्याचाच परिपाक म्हणून जनतेसाठी आवश्यक अशी कोणतीही कृती व दंडात्मक कारवाई करण्यास भ्रष्टाचारात लिप्त अशा सर्व यंत्रणा कुचकामी ठरल्या आहेत. किंबहुना त्यासाठीच बलाढ्य अशी न्यायिक यंत्रणा जनतेचा प्रबळ पाठीराखा आहे असे गृहीत धरुनच आपणाकडे ही आग्रही मागणी केली जात आहे. ज्यामुळे संकटग्रस्त नागरिकांच्या जीवन मूल्यांना मोठा आधार मिळू शकेल..!

*

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
सोमवार २८ जुले २०२५
https://lokaarambh.com



# पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रम



नेकनुर येथील पि.के. अण्णा पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे पंकजाताई गोपीनाथ मु ंड े यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रम संपन्न झाला.शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप विद्यार्थ्याला खाऊ वाटप, तसेच वृक्ष लागवड करण्यात आले. वृक्षारोपणाचा कार्यक्रम विद्यालयाच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. यामध्ये शिक्षक विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिकांची लक्षणीय उपस्थिती बघण्यास मिळाली.कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी व तयारीसर्व शिक्षक गण तसेच वर्ग १ते १० वि च्या विद्यार्थी यांनी पार पाडली त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी आपल्या हाताने एका झाडाचे रोपण केले. तसेच यानंतर विद्यालयाच्या सभागृहामध्ये कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे यांनी झाडाचे महत्व आणि पर्यावरणामध्ये झाडाचे अनन्य साधारण महत्व कसे आहे, यावर भाषण दिले त्यांनी भाषणातून झाडे लावा झाडे जगवा असा संदेश सर्वांना दिला. तसेच विद्यालयाचे जिया सर यांनी सुद्धा झाडाचे महत्व यावर भाषण दिले. आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम व्यवस्थित पणे पार पडला म्हणून सर्वांचे अभिनंदन सुद्धा केले तसेच,प्रत्येकाने किमान एक तरी झाड लावावे अशी सर्वांना त्यांनी विनंती आपल्या भाषणात केली. या कार्यक्रम प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सालगुडे सर कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राथमिकचे मुख्याध्यापक शिंदे सर हे होते, तसेच प्रमुख पाहुणे, भोसले सर काळे सर ,जगताप , करंडे सर मोरे सर मिरगे मॅडम, खोसे मॅडम, विश्वास शिंदे हे उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायाळ मॅडम यांनी केले आभार प्रदर्शन काळे सर यांनी केले. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी कार्यक्रमाचा छान आयोजन पंकजाताई मुंडे यांचे कट्टर समर्थक जियाभाई शेख यांनी केल


# उत्तम कर्तृत्व आणि दुरदृष्टी यातून उत्तम नेतृत्व साकारते-डॉ.नरेंद्र निळेकर

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात आयोजित विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबीराच्या उदघाटन प्रसंगी डॉ. नरेंद्र निळेकर बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, नेतृत्वाचे गुण विद्यार्थी दशेतच विकसित होत असतात सामाजिक, धार्मिक, प्रशासन, राजकीय क्षेत्रात उत्तम नेतृत्व साकारण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि दुरदृष्टी हे गुण महत्त्वाचे आहे. या शिबीराचे उदघाटन शिबीर गीत, दिपप्रज्वलन व माता सरस्वतीचे पूजन करुन झाले. या प्रसंगी सत्राचे अध्यक्ष केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड हे होते तर व्यासपीठावर माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शिबीर निरीक्षक श्रीमती सोनल तांबट, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते. यावेळी प्रशांत भानप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, या सत्राचे अध्यक्षीय समारोप करताना प्रकाश दुगड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करताना मोबाईल च्या व्यसनापासून दूर रहावे. प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी केले. हे शिबिर एकुण चार सत्रात संपन्न झाले. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. गजानन होन्ना यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विविध आयमांचा परिचय व कार्य याविषयी मार्गदर्शन केले. तिसरे सत्र विद्या सभेच्या अभ्यासपुरक मंडळांतर्गत वर्ग प्रतिनिधी, संस्कार, ज्ञानोपासक, कलोपासक, बलोपासक, विज्ञान मंडळ इत्यादी मंडळ प्रमुख विद्यार्थ्यांची आयामश: (मंडळश:) बैठक चौथे सत्र समारोप सत्र होते. या सत्राचे अध्यक्ष केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त संगीत अध्यापक प्राणेश पोरे तर व्यासपीठावर प्रशांत भानप, श्रीमती सोनल तांबट, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते. यावेळी प्राणेश पोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की, विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबीरातून विद्यार्थ्यांच्या मन, मस्तक , मनगट यांचा विकास होण्यासाठी उपयोगी होतो, उत्तम नेतृत्व निर्माणासाठी कर्तृत्व, दातृत्व आणि वक्तृत्व इत्यादी गुण आवश्यक आहे. देशाला विविध क्षेत्रात भावी उत्तम नेतृत्व अशा शिबीरातून मिळावेत हाच या शिबीराचा उद्देश आहे. या शिबीराचे अहवाल वाचन अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीमती अपर्णा मुळे यांनी केले. या शिबीरातील सर्व सत्राचे सुत्रसंचलन, आभार, सर्व विद्यार्थ्यांनी केले.

# सहस्त्रकुंड धबधबा प्रवाहित, पर्यटकांची मोठी गर्दी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : नांदेड जिल्ह्यासह तालुक्यात झालेल्या पावसामुळे सहस्त्रकुंडचा धबधबा ओसंडून वाहत असल्याने पर्यटक आनंद लुटतांना दिसत आहेत.किनवट तालुक्यातील इस्लापूर भागात पावसाने सहस्त्रकुंडचा धबधबा ओसंडून वाहत आहे.आठवड्यापासून जिल्ह्यात कुठे रिमझिम तर कुठे जोरदार पावसाने धुमाकूळ घातला आहे.या पावसाने नदी, वनतळे, शेततळे, नाले, वाहू लागले असून, सहस्त्रकुंड, धबधबा सुरू झाला आहे.धबधबा पाहण्यासाठी पर्यटकांची मोठी गर्दी वाढली आहे. सहस्त्रकुंड धबधबा हा महाराष्ट्रातील प्रसिद्ध धबधब्यापैकी एक आहे. पावसाळ्यात अनेक निसर्गप्रेमी भेट देण्यासाठी या धबधब्याला भट देण्यासाठी येत असतात. हा धबधबा पाहण्यासाठी पावसाळ्यात लाखो लोक गर्दी करतात. सर्वात मोठा धबधबा : सहस्त्रकुंड धबधबा हा मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर आहे.या धबधब्याचा काही भाग यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यात येतो, तर काही भाग नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात येतो. सहस्त्रकुंड धबधबा पैनगंगा नदीवर आहे, जो मराठवाडा आणि विदर्भाला विभाजित करतो नांदेड आणि यवतमाळ जिल्ह्यातील पर्यटकांसोबतच हा धबधबा महाराष्ट्रभरातील पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. नदीचा प्रवाह एका मोठ्या खडकाने विभागला जातो ज्यामुळे पाणी दोन वेगळ्या प्रवाहांमध्ये येते. नदीच्या अलीकडील प्रवाहातील हा सर्वात मोठा धबधबा आहे. जोरदार पावसामुळे जिल्ह्यातील तलाव आणि धबधबे पूर्ण क्षमतेने वाहत आहेत. जिल्ह्यात झालेल्या जोरदार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणीसाठे पूर्ण क्षमतेने भरले आहेत. इस्लापुर धबधबा पर्यटकांसाठी एक आकर्षक ठिकाण बनले आहे.या धबधब्याच्या ठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे आवश्यक आहे.





# क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनरेगाच्या कामात

## महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती कार्यक्रम संपन्न

( गेवराई )दि.२५ जुलै क्रांती महिला असंघटित कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मनरेगाच्या कामात महिलांचा सहभाग व रोजगार निर्मिती तसेच महिला कार्यकर्त्यांना प्रशिक्षण कार्यक्रम ठेवण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती कुटे मॅडम नायब तहसीलदार गेवराई तर प्रमुख पाहुणे विलास मगरे सर विभागीय समन्वयक (कोरो इंडिया), आप्पासाहेब कानगुडे नगरसेवक गेवराई,श्रीमती शारदा डोईजड मॅडम,श्री मनोहर चाळक साहेब सामाजिक कार्यकर्ते गेवराई,एडवोकेट संदेश पोतदार साहेब,बंडू खरात,अनिल आबा मस्के रोजगार सेवक हे होते.

महात्मा गांधी रोजगार हमी योजने मध्ये ग्रामीण भागातील महिलांचा सहभाग या आधारे त्यांना रोजगार मिळवून देऊन त्यांना त्यांच्या





संसारात आर्थिक आधार मिळवुन देण्यास व रोजगार देण्यास ग्राम पंचायत कडे नमुना नंबर ४ मध्ये अर्ज कसा करायचा याबद्दल सविस्तर माहिती दिली.पंचायत समिती कडून सरकारी नियमानुसार शंभर दिवस रोजगाराची हमी असल्यामुळे ज्यांना रोजगाराची आवश्यकता आहे अशा ग्रामीण भागातील महिला मजूर व इतरांना रोजगार मिळू शकतो याचीही माहिती व आपले हक्क आपले अधिकार याची माहिती दिली.महिला सक्षमीकरण व आर्थिक विकास याची सविस्तर माहिती श्रीमती शाहीन असलम खाँ पठाण यांनी सर्व महिलांना त्याची सविस्तर माहिती दिली.श्रीमती शारदा डोईजड मॅडम यांनी जमलेल्या महिलांना पीएम विश्वकर्मा योजना व पीएम किसान कौशल्य विकास योजना यांची सविस्तर प्रशिक्षण कसे प्राप्त करून घ्यावे व बँक लोन साठी कागदपत्राची पूर्तता कशी करावी याची माहिती दिली.श्रीमती कुटे मॅडम नायब तहसीलदार गेवराई यांनी आलेल्या महिलांना तहसीलच्या अनेक योजनाची सविस्तर माहिती दिली.श्री मनोहर चाळक सामाजिक कार्यकर्ते गेवराई यांनी जमलेल्या महिलांना प्रत्येक योजनेचा लाभ कसा घ्यावा व त्यासाठी आपली कुठेही अडवणूक झाली तर पूर्ण मदत करण्याची हमी व ते काम पूर्ण होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करण्याची हमी आपल्या भाषणातून व्यक्त केली आहे.श्री एडवोकेट संदेश पोतदार साहेब यांनी एकल महिला,विधवा महिला,दिव्यांग महिला यांना कोर्ट दरबारी कोणतीही अडचण निर्माण झाली तर त्यासाठी लागणारे कागदपत्र व कायदेशीर सल्ला देण्याचे आपल्या भाषणात व्यक्त केले आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.तुकाराम गवारे पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती शीतल गोचडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गवारे पाटील,मनीषा शरणागत,अंजुम इसाक सय्यद,शकुंतला घुन्गासे,धापसे मॅडम,स्वर्णा मस्के,वहिदा शेख,मोहन धुरन्दरे,शेख नफीस,शेर-ए-हिंद ब.उ.से.संस्थाचे संस्थाप्रमुख शेख आमेर पाशा यांनी परिश्रम घेतले.

# सांगा आम्हाला माझी शाळा सुंदर शाळा म्हणायचं तरी कसं?

## वांगी येथील विद्यार्थ्यांचा सवालभेगा पडलेल्या भिंती ,गळके पत्रे आणि वर्गात साचणारे पाणी शिक्षक विद्यार्थ्यांना झाडु आणि सुपली हातात घेऊन काढण्याची वेळ :- डॉ.गणेश ढवळे

बीड :- ( दि.२७ ) बीड तालुक्यातील वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना ङ्ग माझी शाळा सुंदर शाळाङ्ख म्हणायचं तरी कसं अशा प्रश्न पडला आहे. कारण भेगा पडलेल्या भिंती,गळके पत्रे आणि पावसाळ्यात दररोज शिक्षक आणि विद्यार्थ्यांना अगोदर झाडु आणि सुपली हातात घेऊन वर्गात साचलेले पाणी वर्गाबाहेर काढावे लागते. त्यामुळे केवळ रंगरंगोटी करुन शाळेच्या भिंतीवर ङ्गमाझी शाळा सुंदर शाळाङ्ख लिहिल्याने आनंददायी शिक्षण मिळणार आहे का?? बीड जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीसाठी व नविन इमारत बांधकामासाठी निधी देण्यात यावा याकडे अजितदादा पवार पालकमंत्री,लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांचे लक्ष्य वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली १५ आगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात




येणार आहे.शिक्षण विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे ; निधी मंजूर झाला की देऊ असे आश्वासन दिले जाते :- धनवे निरंजन ( प्रभारी मुख्याध्यापक)वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची स्थापना १९५३ ची असुन वर्ग पहिली ते सातवी पर्यंत असलेल्या शाळेत १०५ विद्यार्थी पटसंख्या आहे. १० वर्गखोल्या असुन ६ शिक्षक कार्यरत असुन २ पदे रिक्त आहेत. शाळेच्या दुरावस्थेविषयी शिक्षण विभागाला लेखी कळवले असुन जिल्हा नियोजन मधुन निधी मंजूर होताच निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे वरिष्ठ स्तरावरून कळवले असल्याचे प्रभारी मुख्याध्यापक धन्वे निरंजन यांनी सांगितले.

पावसाळ्यात शिक्षक आणि मुलांना झाडु आणि सुपलीने पाणी काढावे लागते ? विद्यार्थी आनंददायी शिक्षण कसे घेणार? :- चव्हाण तारा ( शिक्षिका)पत्रे ठिकठिकाणी गळके असल्याने पावसाळ्यात वर्गात पाणी साचते. वर्गात आल्या बरोबर झाडु आणि सुपली हातात घेऊन वर्गात साचलेले पाणी बाहेर काढावे लागते. भेगा पडलेल्या भिंती अशा धोकादायक वातावरणात आनंददायी शिक्षण कसं होणार? असा उद्विग्न प्रश्न शाळेतील शिक्षिका तारा चव्हाण यांनी उपस्थित केला आहे.आंदोलने करूनही प्रशासनाला गरीबांच्या लेकरांच्या शिक्षणाचं सोयरसुतक नाही :- हरिभाऊ शेळके ( सामाजिक कार्यकर्ते) वांगी येथील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरावस्थेबाबत सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ शेळके यांनी २-३ वेळा आंदोलने केली. मात्र दुरूस्तीच्या नावाखाली बाह्य रंगरंगोटी केली जाते. जाधव वस्ती,कोलगुडे वस्ती, शेलार वस्ती,कोटुळे वस्ती,बजगुडे वस्ती येथील २-३ किलोमीटर वाड्या वसत्यावरून शिक्षणासाठी आलेल्या गोरगरिबांच्या लेकरांच्या शिक्षणाचे शासन आणि लोकप्रतिनिधींना सोयरसुतक नसल्याची संतप्त प्रतिक्रिया हरिभाऊ शेळके यांनी दिली. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे बीड जिल्ह्यातील ३८१ शाळांमध्ये ६०७ वर्गखोल्यांची दुरुस्ती आवश्यक आहे. शिक्षण विभागाने यासाठी १४ कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव नियोजन समितीकडे दिला असुन ग्रामीण भागातील शेतकरी, ऊसतोड मजुर, गोरगरिबांच्या लेकरांचे शिक्षण जीव मुठीत घेऊन धोकादायक ईमारतीमधुन होत असुन पालकमंत्री अजितदादा पवार यांनी नियोजन समितीच्या निधीतुन १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी यासाठी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी प्रशासनाला दिले आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# वक्फच्या इतिहासात सुवर्णअध्याय! समीर काझी यांचा अध्यक्षीय वर्षपूर्तीचा झंझावाती आढावा

## वक्फच्या न्याययात्रेचा नवा सूर्योदय – एक अध्यक्ष, एक वर्ष, असंख्य क्रांतिकारक निर्णय!





बीड प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या एक वर्षपूर्तीच्या निमित्ताने बीड येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आपल्या कार्यकाळातील क्रांतिकारक कामांचा साक्षेप आढावा सादर केला. येत्या ५ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांचा अध्यक्षीय कार्यकाळ पूर्ण होत असून त्या निमित्ताने राज्यस्तरीय पत्रकार परिषद घेण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना समीर काझी यांनी स्पष्ट शब्दांत आपली भूमिका मांडली. “समीर काझी जिंदाबाद म्हणा किंवा मुर्दाबाद म्हणा, पण वक्फच्या हितासाठी आंदोलन करा,” असे म्हणत त्यांनी वक्फ हितासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले. “जर माझ्या कार्यकाळात मी एकही चुकीची स्वाक्षरी केली असेल, एखादे चुकीचे काम केले असेल, तर त्याचा विरोध करावा. मात्र जे माझ्या कार्यकाळात घडलेच नाही, अशा गोष्टींवरून टीका करणे योग्य नाही,” अशा शब्दांत त्यांनी टीकाकारांवर निशाणा साधला. “जे दोन वर्षे बोर्डाचे सदस्य राहिले, त्यांना त्यावेळी काही चुकीचे का दिसले नाही?” असा सवालही त्यांनी उपस्थित केला.समीर काझी यांनी विरोधकांना उद्देशून सांगितले की, “विरोध करावा, पण तो तथ्याधारित असावा.” त्यांनी आपल्या कार्यकाळातील पारदर्शक कारभार, वक्फ मालमत्तेच्या सुरक्षेसाठी घेतलेले निर्णय आणि समाजाच्या उन्नतीसाठी हाती घेतलेल्या योजनांचा उल्लेख करत आपल्या भविष्यातील योजनांची झलकही दिली.”वक्फसाठी नाही, तर समाजाच्या उन्नतीसाठी लढतोय – मी थांबणार नाही!” या भावनिक शब्दांत त्यांनी पत्रकार परिषद संपवली आणि आपल्या समाजहितासाठीच्या संघर्षाची दिशा स्पष्ट केली.

### बीडच्या विकासासाठी तीन महत्त्वाच्या प्रकल्पांना गती..!

“कॅश वक्फ”ला ७० वर्षांनंतर नवे प्राण..! गेल्या अनेक दशकांत दुर्लक्षित असलेल्या कॅश वक्फसाठी स्वतंत्र बँक खाते सुरू करून आता विधवा, अनाथ आणि गरीब विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी निधी वापरण्यात येणार आहे. यासह १०० पीएच. डी. करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना एक लाखाची शिष्यवृत्ती आणि ५० विधवा महिलांना प्रत्येकी ५०,००० रुपये आर्थिक मदत दिली जाणार आहे.

### अतिक्रमणविरोधात आक्रमक पावलं – उत्पन्नात मोठी वाढ..!

छत्रपती संभाजीनगर आणि बीडसह अनेक ठिकाणी वक्फ जमिनीवरील अतिक्रमणविरोधात धडक कारवाई सुरू आहे. ज्या व्यक्तींनी वक्फ जमिनी अतिक्रमित केल्या आहेत, त्यांना कायदेशीर भाडेपट्ट्यावर आणून वक्फच्या उत्पन्नात वाढ केली जात आहे. यामध्ये बुलडोझर कारवाईलाही मागे हटणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे

### वक्फ कार्यालयांचा सशक्तिकरण आणि डिजिटायझेशनचा महासंकल्प..!

पूर्वी केवळ २७ कर्मचाऱ्यांवर सुरू असलेल्या वक्फ बोर्डाच्या कामकाजाला त्यांनी नवे बळ दिले. २०० हून अधिक कर्मचाऱ्यांची भरती, जिल्हा कार्यालयांसाठी स्वतंत्र इमारती, आणि मुख्यालयातील ओझं कमी करून स्थानिक सेवा सक्षम करणं – ही कामगिरी वक्फ इतिहासातील एक मैलाचा दगड ठरली आहे.१०० ते २०० वर्षांपूर्वीचे जीर्ण रेकॉर्ड स्कॅन करून जतन करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून, आधुनिक मशीनच्या साह्याने ते संग्रहीत केले जात आहेत.

### “कॅश वक्फ”ला 70 वर्षांनंतर नवे प्राण..!

गेल्या अनेक दशकांत दुर्लक्षित असलेल्या कॅश वक्फसाठी स्वतंत्र बँक खाते सुरू करून आता विधवा, अनाथ आणि गरीब विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी निधी वापरण्यात येणार आहे. यासह १०० पीएच. डी. करणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना एक लाखाची शिष्यवृत्ती आणि ५० विधवा महिलांना प्रत्येकी ५०,००० रुपये आर्थिक मदत दिली जाणार आहे.

### राजकारणाची सावली आणि षडयंत्रांवर ठामपणे उत्तर..!

विरोधकांकडून सुरू असलेल्या राजकीय कारस्थानी षडयंत्रांना ठाम प्रत्युत्तर देत, समीर काझी यांनी स्पष्ट केलं की – “लोकांची कामं होत असल्यामुळेच काहींची पोटदुखी सुरू आहे. वक्फच्या इतिहासात आम्ही नवीन पायंडा पाडला आहे, आणि ही गोष्ट काही विघ्नसंतोषींना सहन होत नाही.”


### मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष सहकार्य..!

या यशस्वी वाटचालीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे त्यांनी नम्रपणे मान्य केले. त्यांच्या सहकार्यामुळेच महाराष्ट्र वक्फ बोर्डाला केंद्र व राज्य शासनाकडून भरघोस निधी मिळू शकला.

# मंत्री पदासाठी आमदार प्रकाश सोळंके यांनी पेटवला ओबीसी, मराठा वाद.?

## पक्ष नेतृत्वाला ओढले जातीय समीकरणात.!

माजलगाव- विधानसभा निवडणुकीत स्वतःच्या पुतण्याच्या विश्वासघात करुन याना-त्या कारणाने पक्षा कडून स्वतःलाच उमेदवार मिळवणारे माजलगावचे आमदार प्रकाशदादा यांना त्यांची मंत्री पदाची जिज्ञासा पुर्ण झाली नव्हती म्हणुन संतोष देशमुख यांच्या खुनानंतर मराठा वाद निर्माण करुन धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा या मागणीसाठी आंदोलनात अग्रेसर भुमिका घेतली होती. यात सर्वच "समदुःखी" एकत्र आल्याने धनंजय मुंडे यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला आणि आता त्यांनी कृषी खात्याचे मंत्री असताना त्यांच्या विरोधात याचिकेवर उच्च न्यायालयाने क्लीन चिट दिली आहे. यातच २५ जुलै रोजी पुणे येथे ना.अजितदादा पवारांनी धनंजय मुंडे यांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश करण्याबाबत चर्चा करून निर्णय घेतला जाईल असे सांगितले होते यावर आमदार प्रकाशदादा सोळंके भलतेच भडकले व त्यांनी मराठा आरक्षणावर वादग्रस्त वक्तव्य केले होते आणि त्यावर घटलेली दुर्देवी घटना घडली होती हे सर्वांना माहीत आहेच. पण याची पुन्हा पुन्हा उजळणी म्हणून की,



राजकीय जातीय समीकरण बिघडले पाहिजे म्हणुन आ.सोळंके यांनी ना.अजित पवार यांच्या नमुद बोलण्याचा विपर्यास करून त्याची भुमिका माजलगावातील एका वृत्त वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आत्तापर्यंत ओबीसी समाजाच्या नेत्यांना मंत्रीपद दिले आहे म्हणुन राजकीय क्षेत्रात बीड जिल्हा ओबीसी समाजाच्या नेत्यांना मंत्रीपद देण्यास राखीव असुन मराठा आमदाराला मंत्री पद मिळाले आहे. राकॉंने मराठा समाजाचा मतदानासाठी वापर केला आहे आणि ते मराठा समाजाचे असल्याने त्यांना मंत्री पद मिळाले नाही असा आरोप आ.सोळंके यांनी केला तर स्मरण शक्ती जागृत करून ते म्हणाले की,सुंदररावजी सोळंके साहेबां नंतर मराठ्यांच्या एकलाही कॅबिनेट मंत्री पद मिळाले नाही. ------------------------------------

### राकाँनेच दिले होते ६खात्यांचे राज्य मंत्री, परभणीचे पालकमंत्री ; प्रकाश दादांना विसर.!

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार)वर दबाव आणण्याचा प्रयत्न करुन मंत्रीपद ओबीसीचे आरक्षण असल्याचे सांगणाऱ्या प्रकाश दादांना शरद पवार यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सरकारच्या काळात मराठा आमदार म्हणुन ६खात्यांचे राज्य मंत्री, परभणीचे पालकमंत्री केले होते आणि ते दिड दोन वर्षांच्या कालावधीतच अजित पवारांची राजकीय डावपेच आखत प्रकाश दादांचे मंत्री पद काढले होते आणि त्या काळातील अत्यंत विश्वासु मराठा आमदार सुरेश धस यांना मंत्रीपद देण्यात आले होते. राहिला प्रश्न कॅबिनेट मंत्री पदाचा तर शिवाजीराव पंडित, सुरेश नवले हे कॅबिनेट मंत्री नव्हते काय असा प्रश्न सामान्य नागरिकांच्या चर्चेतुन उपस्थित केला जात आहे.

# माजलगावात साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जन्मोत्सवाचे आयोजन – उपसरपंच अनिल राधे कांबळे

माजलगाव, प्रतिनिधी : .. दि.२७. जुलै.

लोकशाहिर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जन्मोत्सव २०२५ चे आयोजन शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात अनिल राधे कांबळे मित्र परिवाराच्या वतीने दि. ३० जुलै रोजी करण्यात आले असुन भव्य मोटारसायकल रॅली, गायनाचा कार्यक्रम असे उपक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आयोजक उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी दिली आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन मा. मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते होणार असुन अध्यक्षस्थांनी मा. सभापती नितीन नाईकनवरे, मिलींद आवाड, मोहन जगताप, आमदार प्रकाश सोळंके, ओम प्रकाश शेटे, बाबुराव पोटभरे, सहाल चाउस यांची विशेष उपस्थिती असणार आहे. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. सुरेश साबळे, शिवाजी रांजवण, सुशिल डक, मनोज जगताप, सचिन सानप, राजेश मेंडके, डॉ. दिनकर मस्के, नारायण भले, पद्माकर कांबळे, कचरू कांबळे, संपादक दीपक थोरात, सभापती जयदत्त नरवडे, मा. सभापती कल्याण आबुज, मा. नगरसेवक विनायक रत्नपारखी, शरद यादव, दीपक मेंडके, इरफान खान, शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले, शिवाजी सुतार, सरपंच राज अर्जुन, सरपंच अजय शिंदे, दयानंद स्वामी, भास्कर शिंदे, मानवी हक्क अभियानचे राजेश क्षीरसागर, मधुकर कांबळे, दत्ता कांबळे, अमोल शेरकर, एकनाथ मस्के, विठ्ठल तूपसुंदर,



सदानंद प्रधान, ज्ञानेश्वर सरोदे, येसूब आतार, अनिल भिसे, डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले, डॉ. यशवंत गाडगे, डॉ. अमोलर परतुरकर यांची उपस्थिती असणार आहे. दि. १ ऑगस्ट रोजी सकाळी १०. ३० वाजता भव्य मोटारसायकल रॅली छत्रपती संभाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकांपर्यंत काढण्यात येणार आहे तर शाहीर शितल साठे, युवराज ढगे, गायक सुमित साळवे आणि संच यांचा गायनाचा कार्यक्रम होणार आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक उपसरपंच अनिल राधे कांबळे, संयोजक रोहित भिसे, जयंती उत्सव समिती अध्यक्ष विक्रांत कांबळे, उपाध्यक्ष संकेत कांबळे, सचिव श्याम कांबळे, सहसचिव मनोज गायकवाड, कोषाध्यक्ष युवराज कांबळे, सहकोषाध्यक्ष शुभम भिसे, सदस्य प्रदीप कांबळे, प्रवीण कांबळे, सदस्य सुहास शिरसागर, सदस्य मयूर कांबळे यांचेसह अनिल राधे मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## भाटुंबा येथे खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचे जंगी स्वागत

केज | प्रतिनिधी केज तालुक्यातील भाटुंबा येथे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचे गावातुन ढोलांच्या गजरात मिरवणूक काढत ठिकठिकाणी फटाक्यांची आतिशबाजी करत महिलांनी त्यांचे औक्षण करून खासदार सोनवणे यांचे ज्ञानेश्वर तात्या चवरे यांच्यासह ग्रामस्थांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले. केज पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर तात्या चवरे यांनी स्नेह भोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमा निमित्त बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे हे भाटुंबा येथे आले आसता ज्ञानेश्वर तात्या चवरे यांनी लाडक्या खासदारांची गावातुन ढोल ताशा, फटाक्यांची आतिषबाजी, ठिकाणी ठिकाणी गावातील महिलांनी औक्षण केले आशी आगळावेगळी मिरवणूक काढली भाटुंबा येथील चहात्यांनी काढली, यावेळी बजरंग बप्पा बोलाताना आसे म्हणाले सर्वांना सोबत घेत काम करणार कोणाला काही आडचणी असतील तर मला सांगा मी सर्वांच्या अडचणी सोडविण्यासाठी तत्पर आहे ,या भव्य दिव्य स्वागतान मी भाराऊन गेलो मी ज्ञानेश्वर तात्या चवरे यांचा रुणी आहे या कार्यक्रमासाठी केज तालुक्यातील नव्हे तर अंबाजोगाई,आष्टी तालुक्यातील बजरंग बप्पा सोनवणे,व ज्ञानेश्वर तात्या चवरे यांचे चहाते आले होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार माजी सभापती ज्ञानेश्वर

## देवगिरी अर्बन चे सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम...




माजलगाव : ( प्रतिनिधी ). दि.२७ जुलै. माजलगाव तालुक्यातील सहकार क्षेत्रात विश्वासाने घेतले जाणारे नाव म्हणजेच देवगिरी अर्बन. सदरील संस्था मागील ५ वर्षापासून कार्यरत आहे. संस्था भविष्याचा वेध घेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अचूक, जलद, सर्वोत्तम व सुरक्षित बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे. आज रोजी संस्थेने २५ कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण केलेला आहे. सहकार क्षेत्रामध्ये केवळ आर्थिक व्यवहारा पुरतेच मर्यादित न राहता सामाजिक जाणीव आपल्या विचारातून आणि कृतीतून जोपासत संस्थेने ६००० हुन अधिक लोकांच्या नेत्र तपासण्या मोफत करून पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले तसेच गरजू व असाहाय्य वृद्धांचा ऑपरेशन चा खर्च सुद्धा संस्थेच्या वतीने करण्यात आला. संस्थेव्दारा पुरवत असलेल्या अचूक, जलद, सर्वोत्तम व सुरक्षित बँकिंग सेवेमुळे आज संस्था हजारो सभासदांच्या मनात घर करून आहे.

# छत्रपती संभाजी महाराज चौकात खड्ड्यांचे साम्राज्य

## ऐन वळणावरच खड्डे पडल्याने नागरीकांना करावा लागतो जिवघेणा प्रवास

माजलगाव :.....माजलगाव शहभराचे प्रवेशद्वार आसलेला चौक म्हणजे छत्रपती संभाजी महाराज चौक आणि याच चौकात मोठं मोठे खड्डे पडलेले आहेत यामुळे वाहन धारकांना मोठी कसरत करावी लागत आहे यामुळे अनेक अपघात होऊ शकतात म्हणून वेळीच प्रशासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे याच चौकातून दोन राष्ट्रीय महामार्ग जातात , एक म्हणजे राष्ट्रीय महामार्ग ६१ तर दुसरा राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी जात आहे व याच चौकात हॉटेलं हॉस्पिटल्स तसेच व्यापारासाठी मोठ मोठी दुकानं असल्याने बारमाही वर्दळ असते तसेच अवजड वाहने




देखील याच चौकातून येत जात असतात म्हणून हा चौक माजलगाव शहरातील महत्त्वाचा चौक आहे. आणि याच महत्वाच्या चौकात मोठ मोठे खड्डे पडले आहेत , यामुळे शहराचा विकास किती झाला या दृष्टिकोनातून बाहेरचे लोक पाहतात अगदी शहराच्या प्रवेशद्वारावरच खड्डे बाहेरुन येणाऱ्या प्रवाशांचे स्वागत करत आहेत म्हणून यामुळे शहराचे नाव खराब होत आहे प्रत्येक शहराची शान त्या शहरातील रस्ते आसतात याचा विचार विद्यमान आमदार यांच्या सह शहरातील जिम्मेदार नेते मंडळी यांनी करावा आणि रस्ता विभागाकडून हे खड्डे बुजून चांगले काम करून घ्यावे जेणेकरून या खड्ड्यांमुळे कोणाचाही जीव जाणार नाही किंवा कुणाचे कुटुंब उघड्यावर येणार नाही याची दक्षता घ्यावी व अपघात होण्यापुर्वी हे खड्डे पुर्णपणे बुजून घ्यावेत अशी मागणी शहरातील व तालुक्यातील नागरिकांतून होत आहे.

# बीड शहरातील एका धोकादायक गुंडाची MPDA कायद्या अंतर्गत हर्मुलकारागृहात रवानगी

बीड प्रतिनिधी बीड जिल्हयातीलकायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्याासाठी जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री, नवनीत कोवत यांनी शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत. त्यांना बीड जिल्हयाचे जिल्हाअधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली आहे. बोड जिल्हयातील गुंडगिरीचे समूळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून MPDA कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर तसेच वाळुमाफोया व जुगार खेळणाऱ्या व खेळविणा-या व्यक्तोवर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. या पार्श्वभुमीवर पोलोस अधीक्षक, बीड यांचे सुचनेवरून पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ पोलीस ठाणे बीड शहर यांनी दिनांक 14.06.2025 रोजी इसम नामे सोहेल खॉंन समद खान वय 27 वर्षे रा. जुनी भाजीमंडई बीड ता. जि. बीड याचे विरुद्ध MPDA कायद्या अंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधोक्षक बीड यांच्या मार्फतीने मा. जिल्हादंडाधिकारी साहेब बोड यांना सादर केला होता. सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पोलीस ठाणे बीड शहर येथे खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे, गंभीर दुखापत करणे, जबरी चोरीकरणे, जिवे मारण्याची धमक्या देणे, शिवीगाळ करणे, गैरनिरोध करणे, वगैरे स्वरुपाचे 07 गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे, त्यापैकी 15 गुन्हे न्यायप्रविष्ठ असुन 12 गुन्हे पोलीस तपासावर आहेत, सदरील इसम हा बीड शहरात भाजीमंडई बशीरगंज, सुभाष रोड, बलभीमचौक, कारांजा, राजुरीवेश वैगेरे भागात दादागिरी करुन सर्वसामान्य लोकांना विनाकारण त्रास देत होता. तसेच शरीराविरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे करत होता. त्यामुळे पोलोसांचो त्याचेवर बऱ्याच दिवसांपासून करडी नजर होतो. सदर इसमावर यापूर्वी त्याने त्याची वर्तणूक सुधारावी व चागंले वागावे यासाठी BNSS कलम 129 अन्वये दिनांक 30.09.2024 रोजी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलो होती. परंतु सदर इसम हा प्रतिबंधक कारवाईस न जुमानतापुन्हा चढत्या क्रमाने गुन्हेकरण्याचे चालुच ठेवुन होता. त्याची बीड शहरात प्रचंड दहशत आहे. त्याचे विरुध्द लोक फिर्याद देण्याससमोर येत नाहीत.




सदर प्रकरणात श्री, विवेक जॉन्सन, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक 26.07.2025 रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने एम.पी.डी.ए. कायद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हसुंलकारागृह छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध करणे बाबत आदेशीत केले. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनो सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना पो.नि.श्री. शितलकुमार बल्लाळ पो.स्टे. बीड शहर व पोनि श्री. शिवाजी बंटेवाड स्था.गु.शा बोड यांना दिल्या होत्या. त्यावरुन पोनि शिवाजी बंटेवाड यांनी गोपणीय खबऱ्याच्या आधारे माहीतो काढुन पोउपर्नान श्री सिध्देश्वर मुरकुटे यांचे पथक बोड शहरात रवाना करुन त्यांचे मार्फतीने सदर इसमास दिनांक 26.07.2025 रोजी ताब्यात घेतले व पोलीस ठाणे बीड शहर येथे दिनांक 26.07.2025 रोजी 20.30 वा हजर केले व त्यानंतर पोनि बोड शहर यांनी सदर इसमास योग्य पोलीस बंदोबस्तात हर्सल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक 27.07.2025 रोजी 02.30 वा. हजर करून स्थानबध्द केले आहे. सदरची कामगिरी हो पोलोस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधोक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपत्रिपोअ बीड .पो. नि.श्री. शिवाजी बंटेवाड स्थागुशा बोड, यांचे मार्गदर्शना खाली पो.नि श्री. शितलकुमार बल्लाळ, सपोनि बाबा राठोड, पो.ह सचिन अलगट, महादेव दराडे, गणपती राऊत पो. स्टे बीड शहर व बोड स्थागुशा चे पोउपनि श्री सिध्देश्वर मुरकुटे, सपोउपनि अभिमन्यु औताडे, पोना अंकुश वरपे युनुस बागवान, अश्पाक सय्यद, मनोज परजणे, बिबिसेन चव्हाण यांनो केली आहे. भविष्यातहो धोकादायक गुंड व वाळूचा चोरटा व्यापार करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुचा काळाबाजार करणारे व्यक्तो, मटका जुगार खेळणारे व्यक्ती यांचेवर व दादागिरीकरणाऱ्या व खंडणी बहाद्दर गुंडावर जास्तीत जास्त एम.पी.डी.ए. कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत यांनी दिले आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com